जुलै २०१४

किंमत ₹ ३०/-

# मिळून साऱ्याजणी



स्त्रियांनी आणि पुरुषांनी स्वतःशी आणि परस्परांशी संवाद साधावा यासाठी...

# कलात्मक 'श्वास' पर्यावरणाचा

साधना बहुळकर



**गेल्या वर्षभरात दर महिन्याआड 'चित्रसंवादिनी'च्या माध्यमातून काही स्त्री चित्रकार, शिल्पकार आपल्याला भेटल्या. त्यांचा कलाप्रवास साधना बहुळकर यांनी उलगडून दाखवला. चित्र, शिल्प या माध्यमातून व्यक्त होणारे कलाकार आपल्या कलाकृतीतून आनंद तर देतातच, पण त्याचबरोबर ते काही सांगायचा प्रयत्न करत असतात. काही स्त्री कलाकारांचं हे 'सांगणं' आपल्यापर्यंत पोचवायचा प्रयत्न 'चित्रसंवादिनी'ने केला. या सदराच्या अखेरच्या भागात पुण्याच्या सुप्रिया शिंदे या तरुण शिल्पकर्तीबद्दलचा हा लेख.**

अभिजात शिल्प चित्रकलेच्या क्षेत्रात पर्यावरणासारख्या विषयांची थेट व कलात्मक अभिव्यक्ती अपवादानेच आढळेल. 'मिळून साऱ्याजणी'च्या मुखपृष्ठासाठी तशी कलाकृती निवडावी असा विचार पुढे आला. शोध घेताना प्रस्तुत शिल्पाकृती डोळ्यासमोर आली. ही शिल्पाकृती जानेवारी २०१४ मध्ये 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया' संस्थेच्या वार्षिक स्पर्धात्मक प्रदर्शनात प्रदर्शित झाली होती. ढासळणाऱ्या पर्यावरणाचा तोल राखण्यासाठी वेगवेगळ्या बाजूंनी अनेक पातळ्यांवर काही उपक्रम राबविले जातात. पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित होण्यासाठी काही शैक्षणिक व सामाजिक संस्था किंवा कुटुंबातही लहान मुलांकडून रोपे लावून घेतली जातात. त्याचे प्रत्यंतर देणारे हे शिल्प आहे. मनुष्य-प्राण्याच्या श्वसन क्रियेतील वनस्पतींचे महत्त्वाचे स्थान आपण जाणतो. त्यामुळे वृक्षारोपण व त्याचे संवर्धन ही काळाची गरज आहे. याचे भान जागरूकतेने ठेवले पाहिजे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून ही शिल्पाकृती घडली आहे. पर्यावरणासंबंधीतच्या या शिल्पाकृतीचे शीर्षक 'श्वास' आहे. पर्यावरण विषयाखेरीजही एक स्वतंत्र कलाकृती म्हणूनही हे शिल्प चांगल्या दर्जाचे आहे. 'श्वास'च्या शिल्पकार सुप्रिया शिंदे. त्यांचे शिल्पकला शिक्षण पुण्याच्या भारती विद्यापीठातून २०१२ मध्ये पूर्ण झाले. विशेष म्हणजे लग्न व अपत्य जन्मानंतर कलाशिक्षण घेण्यासाठी सव्वीसाव्या (२६) वर्षी त्या तेथे दाखल झाल्या. जिद्दीने व चिकाटीने आपले शिक्षण पूर्ण केले.

या शिल्पाकृतीत बालकांची जोडी रोप लावून, त्याची निगा राखण्यात गर्क झाल्याचे दृश्य दिसते. मुलांचे सारे अवधान इवल्याशा रोपट्यावर केंद्रित झाले असल्याने साहजिकच त्याकडे लहान असूनही लक्ष जाते. या जोडीच्या चेहऱ्यावरची निरागसता, शरीराकृतीतून जाणवणारे शैशव वेधक आहे. एकंदरीतच हाताळणीत व आविष्कारात साधेपणा आहे. कुठे अवास्तव अलंकरण नाही. दोघांच्या पोझेस साध्या नैसर्गिक आहेत. कपड्यांच्या चुण्या (फोल्डस्) नेमक्या व अचूक आहेत. पाण्याची जड झारी उचलताना असणारी बोटांची पकड, मनगटावरचा जोर यांची अचूक ठेवण शिल्पकर्तीने टिपली आहे. तसेच पाणी घालताना थोडे पुढे झुकल्यामुळे डाव्या पायावर येणारा दाब, मुलीच्या हातांची व बोटांची हालचाल सहजतेने अभिव्यक्त केली आहे. मुलाच्या हाफ पँटचा जाडसरपणा, मुलीच्या फ्रॉकचा पातळपणा व त्यानुसार निर्माण होणाऱ्या जाड-बारीक चुण्या या साऱ्यातून, शिल्पकर्तीचा शरीररचना शास्त्राचा (अॅनोटमी) उत्तम अभ्यास व माध्यमावरील प्रभुत्व प्रत्ययाला



सुप्रिया शिंदे

येते. मुलांची ही जोडगोळी उभारण्यासाठी तयार केलेला मुक्त आकाराचा पाया (Base) व त्या पायाला फिगर्सपेक्षा दिलेला वेगळा रंग हे देखील ह्या कलाकृतीचे वेगळं वैशिष्ट्य आहे. सहजतेने दिसणाऱ्या या वैशिषष्ट्यांसह आणखीही काही या शिल्पातून अभिव्यक्त होत आहे. फिगर्सच्या हालचालींना, आकारांना गोडवा व सौष्ठव आहे. एक प्रकारची लयही निर्माण झाली आहे. लहान मुलीला रोप लावताना दाखविण्यातही औचित्य आहे. आपल्या कृषी संस्कृतीत शेतातील पेरणीची कामे मुख्यत्वे स्त्रियांनी करण्याची पद्धत आहे. त्यानुसार येथे ही स्त्री रोप लावत आहे. स्त्रीत निसर्गतः असणारी फलनक्षमता किंवा सृजनशीलता आणि जमिनीत वाढणारे रोप यांच्यातील निसर्गसिद्ध साम्य शिल्पकर्तीकडून अजाणतेपणे एकत्र गुंफले आहे. त्यामुळेही हे शिल्प अधिक आशयघन वाटते.

हे शिल्प सुमारे साडेचार फूट बाय चार फुटांचे आहे. शिल्प पूर्ण होण्यास दोन-अडीच महिन्यांचा कालावधी लागला. यासाठी परिचयातील मुलांना मॉडेल म्हणून घेतले होते. मुलांचा ÷अभ्यास, खेळ, खाणे-पिणे अशा वेळापत्रकात त्यांना सतत बसविणे शक्य नसते. त्यामुळे त्या पोझमधील त्यांचे फोटोही वेगवेगळ्या अँगलने काढून काही वेळा त्या फोटोंचाही उपयोग केला.

या लेखाच्या निमित्ताने सुप्रिया शिंदे यांची पुणे येथे त्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट घेतली. तेथे त्यांच्या काही शिल्पाकृती प्रत्यक्ष पाहता आल्या तर काहींची छायाचित्रे बघितली. त्यांच्या शिल्पनिर्मितीत स्त्रिया व मुले यांना विशेष स्थान आहे. विषय निवडीत विविधता आहे. सागरगोट्यांचा बैठा खेळ खेळणारी गावाकडची बालिका आहे तशीच मैदानावर चपळतेने बास्केटबॉल खेळणारी आधुनिक कपड्यातील युवतीही आहे. या युवतीच्या शिल्पाकृतीचे शीर्षक 'स्पीड' असे आहे. खेळाडूची गतिमानता, तडफ, अष्टावधानीपणा सारे काही यात अप्रतिमतेने उतरले आहे. शरीररचनेचा,हावभावांचा त्यांचा हा अभ्यास उल्लेखनीय आहे. स्त्रीभ्रूणहत्येत्या संदर्भातील 'बॅलन्स' हे शिल्प किंवा 'जीवननौका' या शिल्पात भविष्यातील 'संकल्पनात्मक' शिल्पांच्या शक्यता जाणवत आहेत. तथापि त्यासाठी अधिक काम, सराव, वाचन, चिंतन, कल्पकता जोपासली गेली पाहिजे.

सुप्रिया शिंदे मूळच्या मंचर गावच्या. दहावी-बारावी पर्यंतचे शिक्षण तेथेच झाले. वडील बंडेश गंजाळेंचा तेथे गणपतीच्या व इतर मूर्ती करण्याचा व्यवसाय आहे. हातात थोडी कला असल्यामुळे गणपतीच्या हंगामाखेरीज निवडणुकींच्या वेळी बॅनर्स करणे, स्थानिक पुढाऱ्यांची चित्रे काढणे अशीही कामे ते करीत. गणपतीच्या हंगामात सारे कुटुंबीयच गणपती करण्यात मदत करीत. दहाव्या वर्षापासून सुप्रियादेखील त्यातील लहानसहान कामे करीत. दहावी उत्तीर्ण झाल्यावर त्या दोन-तीन वर्षे पूर्ण वेळ वडिलांबरोबर काम करीत. मातीकामातील व चित्रकलेतील सुप्रियाची गती बघून मुलीला थोडे कलाशिक्षण द्यायला हवे असे वडिलांना वाटले. त्यामुळे बारावी करून नारायणगावच्या 'मुद्रा स्कूल ऑफ आर्ट' मध्ये त्यांनी एकविसाव्या वर्षी प्रथम वर्षाच्या फाऊंडेशन' कोर्सला प्रवेश घेतला. लगेच बावीसाव्या वर्षी शेखर शिंदे यांच्याबरोबर विवाह झाला. पाठोपाठ मुलाचा जन्म झाला. शेखरजींच्या नोकरीमुळे तीन-चार गावे बदलली. कलाशिक्षण खंडित झाले खरे! पण शेखरजींनी आपली बदली सुप्रियाच्या कलाशिक्षणासाठी

**(पुढील मजकूर पान ४२ वर)**



(पान ३७ वरून)

# कलात्मक 'श्वास' पर्यावरणाचा

पुण्याला होण्याची खटपट केली. घर व मूल सांभाळत २००८ मध्ये सुप्रियांच्या शिक्षणाची सुरूवात झाली. शिल्पकला विभागात त्यावेळी स्त्री विद्यार्थिनी नव्हती. त्यात स्वत:चा बुजरा, संकोची स्वभाव! गावाकडून आल्यामुळे शहरवासियांच्यात मिसळायला अवघडलेपणाही वाटे. घर व कॉलेजखेरीज पुण्याच्या कलाक्षेत्रात त्यांचा वावर नसे. आजही नाही. २०१२ मध्ये प्रथम वर्ग मिळून त्या तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. अल्पावधीतच त्यांनी चांगली प्रगती केली.

कॉलेजमधील कलाशिक्षणामुळे शिल्पकलेच्या त्यांच्या कक्षा रुंदावल्या. शिल्पकलेच्या इतिहासामुळे काही भारतीय व पाश्चात्त्य शिल्पकार त्यांना परिचित झाले. कलेतील आधुनिकता, 'ॲबस्ट्रॅक्ट आर्ट' हे शब्द, त्यामागील कल्पना समजायला मदत झाली. त्यांचा स्वत:चा कल व ओढा वास्तववादी शैलीकडे आहे. त्यात उत्तमोत्तम काम करण्याची त्यांची इच्छा आहे.

पूर्वीचे थोर शिल्पकार गणपतराव म्हात्रे (१८६७-१९४७), बाळाजी तालीम (१८८८-१९७०), विनायक करमरकर (१८९१-१९६७), यांच्या वास्तववादी शिल्पकलेचा परिचय, त्या परंपरेची ओळख सुप्रिया यांना आहे. करमरकरांची शिल्पकला त्यांचा आदर्श आहे. करमरकरांचा स्टुडिओ व संग्रहालय अलिबागजवळील 'सासवणे' येथे आहे. लग्नाच्या वाढदिवसाला शिंदे पती-पत्नी मुद्दाम तेथे गेले. करमरकरांच्या शिल्पाकृतीतील जिवंतपणा, चैतन्य, शरीररचनेचा अभ्यास बघून सुप्रिया भारावल्या. संग्रहालयाच्या बाहेरच्या मोकळ्या जागेत ठेवलेली करमरकरांची शिल्पे बघतांना त्यांचे वेळेचे भान हरपले. दीड-दोन तास त्या तेथेच गुंतून राहिल्या. त्यानंतरही शिंदे पती-पत्नी तीन-चारदा करमरकरांच्या संग्रहालयातील शिल्पे अभ्यासण्यासाठी तेथे गेले. करमरकरांच्या वयोवृद्ध सूनबाई-सुनंदाताईंशी त्यांचा परिचय झाला. करमरकरांचा आशीर्वाद म्हणून सुनंदाताईंनी या नवोदित शिल्पकर्तीची ओटी भरून तिला पाचशे रुपये दिले. आशीर्वादाची ही ठेव सुप्रियांनी आपल्या देव्हाऱ्यात जपून ठेवली आहे. कलाशिक्षणाची सुरूवात व्हायला त्यांना उशीर झाला असला तरी अल्पावधीतच त्यांनी चांगले नैपुण्य मिळविले आहे. तीन-चार पारितोषके मिळून सुरूवात दमदार झाली आहे. वास्तववादी शैलीची शिल्प परंपरा पुढे नेण्याची झलक त्यांच्या शिल्पाकृतीत दिसते. ती परंपरा पुढे नेण्याचे मोठे ध्येय डोळ्यापुढे ठेवून भरपूर काम केले पाहिजे. त्यासाठी कलानिर्मितीचा अविरत ध्यास धगधगत राहिला पाहिजे. आपल्या क्षेत्रात सभोवती काय घडते आहे, कोणत्या प्रकारची व कशा दर्जाची निर्मिती होत आहे ही जागरूकता असणेही आवश्यक आहे.

शिल्प-चित्रकलेच्या क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग आजही इतर कलांच्या तुलनेत बराच कमी आहे. त्यात 'स्त्री-शिल्पकार' आणखी दुर्मिळ! स्त्रियांच्या अशा दुर्मिळतेची दखल 'मिळून साऱ्याजणी'त घेतली जाणे औचित्यपूर्ण आहे. जेष्ठ स्त्री-शिल्पकार अरुणा गर्गे यांचा परिचय डिसेंबर २०१३ च्या अंकात होता. त्यांचे स्थान प्रथम महाराष्ट्रीय स्त्री - शिल्पकाराचे आहे. त्याचवेळी त्याच सदरात आजच्या उमलत्या शिल्पकर्ती सुप्रिया शिंदे यांच्या 'श्वासा'चीही दखल घेतली जात आहे याचा आनंद वाटतो.

●

**साधना बहुळकर**
sadhanabahulkar@gmail.com
**सुप्रिया शिंदे**
चलभाष : ९८८१७१३७१२